# GREEN LAWNS HIGH SCHOOL, WARDEN ROAD

## MARATHI TERMINAL EXAMINATION 2025-2026

### SUBJECT – MARATHI

DATE - 29 SEPTEMBER 2025 CLASS – $10^{TH}$ A/B/C.

DAY – MONDAY DURATION- 2 &1/2 MARKS – 80

---

**INSTRUCTIONS:-** **1.This paper comprises of two sections. Section A and B.**

**2. Section A answers must be written on the answer sheet.**

**3. Section B answers must be written on the paper itself. And Attach paper with section A answer sheet**

---

**विभाग (अ) गुण ४०**

**प्रश्न १. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

अभिषेकनं दार उघडलं आणि कामवाल्या रेखामावशी आत आल्या आल्या आल्या त्यांनी किचनमधील सिंकमध्ये वाट पाहणाऱ्या भांड्यांकडे आपला मोर्चा वळवला. अभिषेकला आज उठायला उशीरच झाला होता काल त्यांच्याकडे सुमित आला होता कानपूरहून. सुमित म्हणजे अभिषेकचा आतेभाऊ तो आय.आय. टी. कानपूरला शिकत होता. काल सध्याकाळी सुमित आल्यापासून गप्पांसोबत सुमितच्या लॅपटॉपवर त्याने केलेले नवे प्रोजेक्ट अभिषेक पाहत होता. त्यामुळे रात्री झोपायला दोन बाजले. काय हो हे, तुम्हीच फरशी पुसता आणि तुम्हीच ती घाण करता? हॉलमधून स्नेहलचा आवाज आला.

"मामा, मी एक ॲप तयार केले आहे त्या ॲपच्या साह्याने आपण कोणाचे पाय किती स्वच्छ आहेत, हे सागू शकतो. सुमितने सागितले .

"सुमित, अरे, पाय स्वच्छ आहेत की नाही, हे सांगायला ॲपची काय गरज आहे? तुम्हा टेक्नोसॅव्ही लोकांना कशाचंही ॲप करण्याशिवाय काही सुचते की नाही? अरे, सगळयात भारी ॲप डोक्याच्या कवटीत आहे, हे विसरलात की काय तुम्ही लोकं? बाबांनी अनाठायी टेक्नॉलॉजीबद्दलची आपली मळमळ व्यक्त केली

" मामा, गंमत तर बघ तू माझ्या ॲपची त्याचं नाव आहे फूटप्रिन्टस." असे म्हणत सुमितने आपला स्मार्टफोन काढला.

सुरुवात करूया रेखामावशींपासून. रेखामावशींना काही प्रश्न विचारायला सुरुवात केली. "मावशी, तुम्ही राहता कुठं? "त्या टेकडीपल्वाड, मावशी म्हणाल्या."इथून किती कि. मी. आहे? "तुम्ही कशा आलात इथपर्यंत?" आतापर्यंत किती झाडं तुम्ही लावली आहेत? असे अनेक प्रश्न सुमितने रेखामावशीला विचारले.

रेखामावशी फिरायच्या पायीच कधीतरी सायकलनं! त्यांच्या इवल्याशा झोपडीपुढही त्यांनी दोन झाडं लावली होती. त्यातलं एक लिंबोणीचं होतं.आता पाहा, या आहेत रेखामावशींच्या फूटप्रिन्टस! खाली इंग्रजीत शब्द उमटले 'सिल्व्हर फूटप्रिन्टस। द मोस्ट क्लिन फूटप्रिन्टस !!!

सुमितनं हलकेच पावडेकाकांच्या गोजिऱ्या तळव्याकडे पाहिले आणि म्हणाला, "काका, आपण तुमच्या पायाचं पाहूया का?" "त्यात पाह्यचं काय? हे बघ, माझे पाय किती स्वच्छ आणि मऊसूत आहेत! सुमितनं पावडेकाकांचा डेटा ॲपमध्ये भरायला सुरू केला. "काका, आता तुम्ही कुठून आलात?" " विश्रांतवाडीहून "कसे?" "अर्थातच, कारने." "वीस किलोमीटर कारने तुम्ही एकटेच! पण काका आठवड्यातून तुमचे फिरणे किती होतं?" तुम्ही एकटेच ये-जा करता?"

"हो. नाही तर काय बसला लटकत जाऊ म्हणतोस?", म्हणाले"काका, तुम्ही काही झाडे लावती आहेत का?" "पावडेकाकूनी कुंडीतल्या रोपाकरिता माती मागितली तर ती आणून देणे होत नाही काकांना, ते झाड काय लावणार?" स्नेहलनं एकदम स्ट्रेट ड्राईव्ह लगावला.

"काका, हे एक शास्त्रीय सत्य आहे तुमच्या कार्बन सोडण्याच्या प्रमाणावरून तुमच्या पावलांचा काळा रंग ठरतो. रेखामावशींच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वावच नाही, म्हणून तर त्यांची पावलं आपल्यापेक्षा अधिक सुंदर, चंदेरी आहेत. आपल्या पायाला चिकटलेला हा कार्बन आपल्याला धुवायला हवा. मी ठरवलय, मी कॉलेजला जाताना सायकल वापरणार. मला माझे पाय रेखामावशीसारखे चंदेरी हवेत, असा निश्चय स्नेहलने केला.अभिषेक भारावून म्हणाला, माझ्या तर कॉलेजसमोरच बसस्टॉप आहे. आजपासून मी बसनंच ये-जा करणार.

'खरंय पोरांनो, आजकाल चालणे, सायकल वापरणे विसरूनच गेलोय आपण. अगदी कोपऱ्यावरून भाजी जरी आणायची असली तरी आपण बाईकला किक मारतो आणि पुन्हा व्यायामाकरिता मॉर्निंग वॉकच नाटक करतो. बसने प्रवास करणे तर आपल्याला कमीपणाचं वाटते.,पण आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्याकरिता पब्लिक ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट असा सल्ला अभिषेकच्या बाबांनी मुलांना दिला.

**कृती १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : गुण ४**

१. सुमीत हा अभिषेकचा कोण होता ?

२. स्नेहलनं एकदम कोणता स्ट्रेट ड्राईव्ह लगावला ?

३. अभिषेक भारावून काय म्हणाला ?

४. सुमीत कोठे शिक्षण घेत होता आणि त्याने कोणते ॲप तयार केले होते?

**कृती २. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :** गुण १

१. सगळ्यात भारी ॲप ------------------------ कवटीत आहे.

२. रेखामावशींच्या रोजच्या जगण्यात ------------------------ उत्सर्जनाला वावच नाही.

**कृती ३. कोण कोणास म्हणाले ते लिहा ( who said to whom )** गुण १

१. " तुम्हीच फरशी पुसता आणि तुम्हीच ती घाण करता? "

**कृती ४ : खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार ओळीत लिहा:** गुण ६

१. सुमितने रेखामावशीला कोणकोणते प्रश्न विचारले?

२. पावडेकाकांना सुमितने कोणकोणते प्रश्न विचारले?

३. अभिषेकच्या बाबांनी मुलांना कोणता सल्ला दिला?

**प्रश्न २. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा : ( कोणतेही ५)** गुण ५

१. चातक पक्षी कोणाची विनवणी करतो?

२. लेखक मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोणत्या वर्षी झाले?

३. मोठे होत असलेल्या या पाठाचे लेखक कोण आहेत?

४. आपल्या पावलांचा काळा रंग कशावरून ठरतो?

५. पृथ्वीवर पक्षिणी केव्हा झेपावते?

६. भारतातील अणुसंशोधनाचा पाया कोणी घातला?

७. भुकेल्या वासराला पाहून कोण हंबरत धावून येते?

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लेखन करा.** गुण ५

१. युवा प्रतिष्ठान, नाशिक यांच्यातर्फे आयोजित वक्तृतव स्पर्धेत ( Oratory competition) , आपल्या शाळेच्या ( From your school ) इयत्ता १० वी च्या समीर जाधव याला जिल्हास्तरावर ( District level) प्रथम क्रमांक ( first prize )

मिळाला म्हणून त्याचे अभिनंदन ( Congratulation letter ) करणारे पत्र लिहा.

OR

२. जागतिक पर्यावरणादिनानिमित ( On the occasion of world environment day ) आपल्या शाळेत ( in your school ) वृक्षारोपण करण्यासाठी ( tree plantation ) रोपांची मागणी ( demand for plants) करणारे पत्र मा. व्यास्थापक , हिरवाई ट्रस्ट , महात्मा गांधी रोड, दादर ( पूर्व ) , मुंबई – ४०००२८ यांना लिहा .

**प्रश्न ४. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

**मानवी संगणक-शकुंतलादेवी**

साधे गणित सोडवायचे तर आपल्याला कोण कटाळा येतो; तर मग गणितातील समस्या अंकगणित. गुणाकार, भागाकार समीकरणे सूत्रे अशा जगङव्याळ झंझटात कोण पडणार ? पण ईश्वरी कृपेचा वरदहस्त लाभलेल्या व निसर्गानेच निर्माण केलेल्या मेंदूचा चमत्कार म्हणावा अशा तीव्र बुद्धीचा वरदहस्त लाभलेली ही स्त्री भारतात जन्मली तिचे नाव शकुंतलादेवी. अत्यंत कठीण वाटणाऱ्या अंकगणितातील समस्या तिने तोंडी सोडवून दाखवून जगातील सर्व शास्त्रज्ञांना दिङमूढ केले.

सर्वसाधारणपणे दुविधेत टाकणारी सूत्रमय समीकरणे संगणक कॉम्प्युटर्सच्या मदतीने सोडवितात; पण शकुंतलादेवीला अशी उत्कृष्ट मज्जासंस्था लाभली आहे की ती संख्याशास्त्राखेरीज फलज्योतिषशास्त्रातही आपली बुद्धीमत्ता वापरते.

लहानपणापासूनच तिला या दिव्य शक्तीची प्राप्ती झाली आहे. अंकगणितातील कोणतीही समीकरणे ती काही सेकंदातच सोडविते. वयाच्या ३ ते ५ वर्षांच्या काळातच ती गणिततज्ञ झाली. तिचे साधारण शिक्षणही झालेले नाही. तिच्या वडिलानी तिला अनेक ठिकाणी नेऊन तिच्या या असामान्य बुद्धीचा चमत्कार दाखविला. तिच्या या असाधारण ख्यातीने देशाच्या मर्यादा ओलांडल्या, परदेशात तिची ख्याती पसरली. एक सर्वांग परिपूर्ण गणिततज्ञ असाच तिचा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो.

बी. बी. सी. लंडन या संस्थेने तिला आग्रहपूर्वक निमंत्रण दिले. तिचा कार्यक्रम टेलिव्हिजनवर प्रदर्शित केला. फक्त संगणकावरच सोडविता येईल असा प्रश्न तिला विचारला आणि तिने त्याचे निमिषार्धातच तोंडी उत्तर दिले. १८ जून, १९८० रोजी तिला २६ अंकी संख्या देऊन फक्त २८ सेकंदात उत्तर देण्यास सांगितले . अंक होता १८९४७६६८१७७९९ आणि ५४२६४६२७७३७३० यांचा गुणाकार, इम्पिरिअल कॉलेज, लंडनचा हा प्रश्न. १९७६ साली तिने अमेरिकेतील शास्त्रज्ञांनाही असेच विस्मयचकित केले.

अशा संख्याशास्त्रज्ञ शकुंतलादेवीने भारतात जन्म घेऊन सारे पाश्चात्य जग भारावून टाकले.

स्वामी विवेकानंदांनी आपल्या भाषणांनी तर शकुंतलादेवीने आपल्या संख्याविज्ञानाने सर्व विश्वाला दाखवून दिले की भारतातही बुद्धिमत्तेची वाण नाही.

**कृती १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. गुण ५**

१. मानवी संगणक असे कोणाला म्हटले आहे?

२. शकुंतलादेवींनी जगातील सर्व शास्त्रज्ञांना दिङमूढ कसे केले?

३. शकुंतलादेवी संख्याशास्त्राखेरीज कोणत्या शास्त्रात बुद्धिमत्ता वापरतात?

४. लंडनमधील कोणत्या संस्थेने शकुंतलादेवींना निमंत्रित केले?

५. २६ अंकी संख्येचा प्रश्न शकुंतलादेवींना कोणत्या संस्थेने दिला होता?

**कृती २. समानार्थी शब्द लिहा.** **गुण २**

**( प्रसिद्धी , ताकद , प्रभू , मुख , तकड , प्रभु )**

१. ईश्वर : ------------------------------ २. तोंड : ------------------------------

३. शक्ती : ------------------------------ ४. ख्याती : ------------------------------

**कृती ३. विरुद्धार्थी शब्द लिहा.** **गुण २**

**( प्रश्न , स्वदेश , सौपे , सोपे , स्व्देश, मृत्यू , मृत्यु )**

१. कठीण X ------------------ २. परदेश X ------------------------------

३. उत्तर X ---------------------- ४. जन्म X ------------------------------

**कृती ४. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :** **गुण १**

१. १९७६ साली तिने ------------------------------ शास्त्रज्ञांनाही असेच विस्मयचकित केले.

२. लहानपणापासूनच तिला या ---------------------- शक्तीची प्राप्ती झाली आहे.

**प्रश्न ५. खालीलपैकी कोणत्यही एका ( ANY 1 ) विषयावर निबंध लिहा :** **गुण ८**

१. माजी सैनिकाचे आत्मकथन : ( Autobiography of a former soldier )

( मुद्दे : सैनिकाचे बालपण – सैनिकाचे शिक्षण – परंपरा शौर्याची – अभिमान – सैन्यात प्रवेश – अनुभव – सैन्यात जाण्याची प्रेरणा कशी मिळाली – तुमचे प्रेरणास्थान – देशाबद्दल अभिमान )

२. निसर्ग हा एक श्रेष्ठ गुरु : ( Nature is a great teacher.)

( मुद्दे : आपल्या आजूबाजूचा परिसर - झाडे , पशु , पक्षी , हवामान , वातावरण – निसर्ग आपल्याला काय काय देतो – निसर्ग आपल्याला काय शिकवितो – निसर्गापासून आपल्याला काय फायदे होतात .)

३. माझा आवडता संत : ( My favourite saint )

( मुद्दे : जगात अनेक संत आहेत – तुमचा आवडता संत कोणता – तुम्हाला तो का आवडतो – संताचे गुणधर्म – त्यांची आवडती शिकवण – संताचा समाजाला उपदेश )

XXX THE END XXX

**GREEN LAWNS HIGH SCHOOL, WARDEN ROAD**

**MARATHI TERMINAL EXAMINATION 2025-2026**

**SUBJECT – MARATHI** **SECTION (B)**

**DATE - 29 SEPTEMBER 2025** **CLASS – 10TH A/B/C.**

**NAME: ---------------------------- DIV: --------- ROLL NO: ---------**

---

**INSTRUCTIONS – Section B answers must be written on the paper itself. And attach paper with Section A answer sheet.**

---

**विभाग (ब) गुण ४०**

**प्रश्न १. (अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :** **गुण ५.**

**( चातक , सक्षम , इंजिनियर , चतक , इंजिनीयर , माता , आई , श्रीफळ , श्रीफाळ , साक्षम , परिश्रम )**

१. अग्निमाजि पडे बाळू । ----------------- धावे कनवाळू ।।

२. ट्रेनिंग स्कूलमधील प्रशिक्षण संपवून मी बार्कमध्ये ----------------- म्हणून जॉईन झालो.

३. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व ------------------- त्यांना मिळत राही.

४. नामा म्हणे मेघा जैसा । विनविती ------------- तैसा ।।

५. पण अंतिमतः स्वतःच स्वतःला --------------- करता आले पाहिजे.

**प्रश्न १. (ब) . खालील शब्दांचे अर्थ लिहा :** **गुण ४**

( ढग , पारदर्शक , बलवान , सुंदर , दयाळू , जवळचा , कठीण , विश्वास)

१. गोजिरा : ------------------ २. खात्री : -------------------

३. स्फटिक : ------------------ ४. सक्षम : -------------------

५. बिकट : ----------------- ६. कनवाळू : ----------------

७. निकटवर्ती : ---------------- ८. मेघ : -----------------



P.T.O

**प्रश्न १. (क) वाक्प्रचार व अर्थ लिहा :** **गुण ५**

**( प्रभावीत होणे , मदत करणे , प्रभावित होणे , हरकत घेणे , वेळ न मिळणे, अभिमान वाटणे , अभीमान वाटणे , हरकत घेने , मदत करने . )**

१. हातभार लावणे : ----------------------

२. उसंत न मिळणे : ----------------------

३. भारावून जाणे : ------------------------

४. गौरव वाटणे : -------------------------

५. आक्षेप नोंदवणे : ----------------------

**प्रश्न १. (ड) खालील शब्दांपासून वाक्ये तयार करा :** **गुण ४**

१. वन : ( forest ) ----------------------------------------

२. भिक्षेकरी : ( beggar ) ----------------------------------------

३. अभ्यास : ( study ) ----------------------------------------

४. सामग्री : ( material) ----------------------------------------

**प्रश्न २. (अ) खालील दिलेल्या अधोरेखित शब्दांचे समानार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा :** **गुण ४**

१. <u>गाव</u> हे निसर्गसौदर्याने नटलेले असते.

उत्तर: --------------------------------------------------------------------

२. आजच्या काळात प्रत्येक माणसाची <u>इज्जत</u> असते.

उत्तर: --------------------------------------------------------------------

३. आनंदला डॉक्टर होण्याची खूप मनापासून <u>मनीषा</u> आहे.

उत्तर: --------------------------------------------------------------------

४. समीक्षाने <u>तर्क</u> लावला की आज भरपूर पाऊस पडणार आहे.

उत्तर: --------------------------------------------------------------------

**प्रश्न २. (ब) खालील दिलेल्या अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा :** **गुण ४**

१. अक्षय आज शाळेत <u>गैरहजर</u> होता.

उत्तर: ------------------------------------------------------------------------------------

२. प्रकाशने केलेल्या कामाचे मला काहीच <u>दु:ख</u> झाले नाही.

उत्तर: ------------------------------------------------------------------------------------

३. माझा शेजारी माझ्यापेक्षा <u>श्रेष्ठ</u> आहे.

उत्तर: ------------------------------------------------------------------------------------

४. समुद्रात आम्ही <u>विशालकाय</u> मासा बघितला.

उत्तर: ------------------------------------------------------------------------------------

**प्रश्न २. (क) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा :** **गुण ४**

( प्रचारक , गृहिणी , जमीनदार , दानशूर , अबोल , गायक , आरोग्यदायी धनवान , जमिनदार , दानशुर , आरोग्यदयी , गृहिनी )

१. जास्त जमीन असलेला : -----------------------------------------------------------

२. घरात राहणारी स्री : ---------------------------------------------------------------

३. जास्त संपत्ती असलेला : -----------------------------------------------------------

४. दान करणारा : ---------------------------------------------------------------------

५. गाणी गाणारा : ---------------------------------------------------------------------

६. आरोग्य देणारी : -------------------------------------------------------------------

७. प्रचार करणारा : ------------------------------------------------------------------

८. कमी बोलणारा : -----------------------------------------------------------------

**प्रश्न ३. (अ) खालील वाक्यातील नाम व प्रकार ओळखा :** **गुण २**

१. सुगरण पक्षी सुबक विणकाम करतो .

उत्तर: नाम : -------------------------- प्रकार : ------------------------

२. पंकजने परीक्षेत पहिला नंबर मिळविला.

उत्तर: नाम : --------------------------- प्रकार : --------------------------



P.T.O

**प्रश्न३. (ब) खालील वाक्यातील विशेषण व प्रकार ओळखा:** **गुण २**

१. त्याने एकसारख्या दिसणाऱ्या तीन मूर्ती मागवल्या.

उत्तर: विशेषण : ------------------------- प्रकार : -------------------------

२. हुशार वैष्णवीलाही गणिताचा पेपर कठीण गेला.

उत्तर: विशेषण : ------------------------- प्रकार : -------------------------

**प्रश्न ४. (अ). खालील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे मराठीत लिहा:** **गुण २**

१. (" ") : ------------------------------------------------------------

२. ( ! ) : ------------------------------------------------------------

३. ( . ) : ------------------------------------------------------------

४. ( , ) : ------------------------------------------------------------

**प्रश्न ४. (ब) खालील वाक्याचे प्रकार ओळखा :** **गुण २**

( विधानार्थी , प्रश्नार्थी , आज्ञार्थी , उद्गारार्थी )

१. दलित समाजाला हा फार मोठा धक्का होता.

उत्तर : ------------------------------------------------------

२. किती अवाक झाली सारी जनता !

उत्तर : ------------------------------------------------------

३. चला , आता जेवायला बसा.

उत्तर : ------------------------------------------------------

४. जरा सोडा मोकळे त्या मनाला.

उत्तर : ------------------------------------------------------

**प्रश्न ४. (क). अचूक शब्द ओळखा:** **गुण २**

१. अग्निमाझी , अग्निमाजी , अगीन्माझी : ------------------------------

२. सर्वाधिकार , सर्वाधीकार , सार्वाधीकार : --------------------------

३. लाघुरूप , लघूरुप्प , लघुरूप : ------------------------------------

४. चिंचोळ्या , चीन्चोल्या , चीनचोल्या : ------------------------------

THE END